| Publication | Edition | Date | Page No. | Subject |
|---|---|---|---|---|
| Loksatta | Mumbai | 17/05/2019 | 03 | Sunny Pawar wins 'The Best Child Actor' Award |

# मुंबईचा सनी पवार सर्वोत्कृष्ट बालकलाकार

## न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिवलमध्ये सन्मान

प्रतिनिधी, मुंबई

**मुंबईच्या सनी** पवार या अकरा वर्षीय बालकलाकाराला १९व्या न्यूयॉर्क भारतीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कारावर मिळाला आहे. 'चिप्पा' चित्रपटातील भूमिकेसाठी त्याला हा पुरस्कार देण्यात आला आहे. कोलकाता शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या एका लहान मुलाच्या स्वप्नाचा प्रवास या चित्रपटातून दाखवण्यात आला आहे.

सनीने २०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या आणि ऑस्ट्रेलियन दिग्दर्शक ग्रॅथ डेव्हिसने दिग्दर्शित केलेल्या 'लायन' चित्रपटातही काम केले होते. सर्वोकृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सनीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. याच महोत्सवात अभिनेता आदित्य कोठारे याला प्रियांका चोप्राच्या 'पर्पल पेबल'ची निर्मिती असलेल्या 'पाणी' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे. हा चित्रपट मराठवाड्यातील सत्य घटनेवर आधारित आहे. या महोत्सवात 'फोटोग्राफ, उरी : द सर्जिकल स्ट्राइक' हे हिंदी चित्रपट आणि भारतीय प्रादेशिक भाषांतील चित्रपटही दाखविण्यात आले. चित्रपट महोत्सवाची सुरुवात रोहेना गेरा दिग्दर्शित 'सर' चित्रपटाने तर समारोप प्रसिद्ध शेफ विकास खन्ना दिग्दर्शित 'द लास्ट कलर' या चित्रपटाने झाला.



**सर्वोत्कृष्ट बालकलाकार हा पुरस्कार मिळाल्याने मला खूप आनंद झाला आहे. दिग्दर्शक सय्यद सफदर रेहमान आणि 'चिप्पा' चित्रपटाच्या सर्व चमूचाही आभारी आहे. या सर्वांमुळे मी माझी भूमिका योग्य प्रकारे साकारू शकलो.**

**- सनी पवार.**